Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 14 February 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १४ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- नव्या फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी अभियोग संचालनालय कार्यान्वित करण्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे महाराष्ट्र सरकारला निर्देश
- पर्यावरण संवर्धनासाठीच्या संरक्षण क्षमता महोत्सव- सक्षम २०२४-२५ ला प्रारंभ
- परभणी जिल्हा कृषी संजीवनी महोत्सवाचं उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उदघाटन

आणि

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप-५४ सुवर्णपदकांसह महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

****

नव्या फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी अभियोग संचालनालय कार्यान्वित करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्य सरकारला दिले आहेत. आज यासंदर्भात झालेल्या बैठकीत शहा यांनी सात वर्षापेक्षा अधिक शिक्षेची तरतूद असलेल्या प्रकरणात दोषसिद्धतेचं प्रमाण ९० टक्क्यांच्यावर नेण्याचे प्रयत्न करण्याची सूचना केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह अनेक अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या कायद्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात राज्यसरकार करत असलेल्या कामाबाबत या बैठकीत सादरीकरण करण्यात आलं, गृहमंत्र्यांनी केलेल्या मार्गदर्शनाबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांना माहिती दिली.

***अतिशय सकारात्मक अशी ही बैठक झालेली आहे. आम्हाला चांगलं मार्गदर्शन यातनं मिळालेलं आहे. हे तिन्ही कायदे लागू करण्याच्या संदर्भात आता आम्ही अधिक वेगानं तिन्ही कायद्यांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे सुरू केलेली आहे. त्या संदर्भात विशेषतः फॉरेन्सीक इन्फ्रास्ट्रक्चर जे आहे, ते आम्ही आता मोठ्या प्रमाणात तयार करतो आहोत. पुढच्या सहा महिन्यामध्ये हे कंप्लिट आमचं फॉरेन्सीक नेटवर्क तयार होईल. प्रत्येक पोर्टचे क्युबीकस तयार करून ते ऑनलाईन जोडण्याच्या संदर्भात आम्ही आता सुरूवात केलेली आहे. त्याची माहिती आम्ही दिली. पुढच्या सहा ते आठ महिन्यात हे काम देखील आम्ही पूर्ण करू. ज्यामुळे कोर्टातली गर्दी देखील कमी होईल. प्रॉसिक्युशन विंगला ट्रेनिंग देऊन कमीत कमी वेळात केस कशी निकाली निघेल यासंदर्भातला प्रयत्न आम्ही करणार आहोत.***

****

डाळवर्गीय पिकांसदर्भात संशोधन आणि पायाभूत सुविधांच्या विकासात खासगी क्षेत्राने सहभाग घ्यावा, असं आवाहन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित भारतीय डाळी परिषदेत ते आज बोलत होते. या परिषदेत आज 'समृद्धीसाठी डाळी – शाश्वततेसह पोषण' या चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. यात रावल यांनी महाराष्ट्रातल्या डाळी उत्पादनातल्या विविधतेचा उल्लेख केला.

****

सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करून दैनंदिन वापरात इंधनाची बचत केल्यास भविष्यासाठी ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाचं उद्दिष्ट गाठता येईल, असा विश्वास महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे. संरक्षण क्षमता महोत्सव-सक्षम २०२४-२५ हा १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान इथं आदिती तटकरे यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या.

दरम्यान, २८ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी मोहीम राबवली जाणार आहे. यामध्ये सर्वसामान्यांमध्ये इंधन बचतीचं महत्त्व तसंच लाभाबाबत जागृती करण्यात येणार आहे. यासाठी सायक्लोथॉन, वॉकेथॉन, चित्रकला स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनेची बांधणी आणि पक्षाच्या महत्त्वाच्या धोरणांच्या अंमलबजावणीसाठी पक्षाच्या कोअर ग्रुपची स्थापना केली आहे. उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ आणि धनंजय मुंडे यांचा या समितीत समावेश करण्यात आला आहे. प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी यासंदर्भातील घोषणा केली. महत्त्वाच्या धोरणांची आखणी, अंमलबजावणी करणे हा या कोअर ग्रुपचा महत्वाचा उद्देश असल्याचं तटकरे यांनी स्पष्ट केलं.

****

न्यू इंडिया सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेनं निर्बंध घातले आहेत. यामुळे बँकेला बचत खातं, चालू खातं किंवा ठेवीदाराच्या इतर कुठल्याही खात्यातून रक्कम काढता येणार नाही. रिझर्व्ह बँकेच्या अटींच्या अधीन राहून कर्ज फेड करता येईल, मात्र १३ फेब्रुवारीपासून नवीन कर्ज देता येणार नाही किंवा गुंतवणूक करता येणार नाही. हे निर्बंध पुढले सहा महिने लागू राहतील, असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

****

शेतकरी हा समाजातील अतिशय महत्त्वाचा घटक असून त्यांना काही कमी पडू दिलं जाणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उद्योगमंत्री तसंच मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिली आहे. महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा परभणी आणि संजीवनी मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी इथं भरवण्यात आलेल्या जिल्हा कृषी संजीवनी महोत्सवाचं उदघाटन आज डॉ. सामंत यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

परभणी जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी निश्चितपणे प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाहीही सामंत यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमास आमदार राजेश विटेकर, माजी खासदार सुरेश जाधव, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी तथा आत्माचे प्रकल्प संचालक दौलत चव्हाण, संजीवनी मित्र मंडळाचे आनंद भरोसे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी, नागरिक उपस्थित होते.

****

गृह राज्यमंत्री योगेश कदम हे आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आले आहेत. आज पोलीस आयुक्तालयात त्यांनी कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेतला. पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्यासह आयुक्तालयातील सर्व अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

****

३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा आज समारोप झाला. उत्तराखंडमध्ये हल्दवानी इथं झालेल्या या समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उपस्थित राहून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. खेळात विजय आणि पराभव होतच असतो, या स्पर्धेत पदक न मिळालेल्या खेळाडूंनी पुढच्या वर्षी होणाऱ्या स्पर्धेत पदक मिळवावं, असं आवाहन शहा यांनी केलं, ते म्हणाले –

> ***सोलह हजार खिलाडी लगभग चार सौं पैंतीस खेलों मे खेले। कुछ जिते, कुछ हारे। हार और जीत उसका खेले से कोई मतलब नही। जीत का जसबा और हार से निराश न होना यहीं खेल का संदेश है। इसलिये जो जीते है और हारे है वो सभी खिलाडीयों को मै अनंत अनंत शुभकामनायें देता हूं। मेघालय मे आपके लिये एक और मौका है। अगली बार मेडल लेके आईये ऐसी मेरी सभी को बहोत बहोत शुभकामनायें।***

पुलवामा हल्ल्यात वीरमरण आलेल्या सैनिकांना शहा यांनी आपल्या भाषणातून अभिवादन केलं.

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पदकतालिकेत ६८ सुवर्ण, २६ रौप्य आणि २७ कांस्यपदकांसह सेना दलाचा संघ पहिल्या क्रमांकावर आहे. ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७३ कांस्यपदकांसह सर्वात जास्त १९८ पदकं जिंकून महाराष्ट्राचा संघ दुसऱ्या क्रमांकावर तर ४८ सुवर्ण, ४७ रौप्य आणि ५८ कांस्यपदकांसह एकूण १५३ पदकं जिंकून हरियाणा संघ तिसऱ्या स्थानावर आहे.

****

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या वतीनं `उत्तुंग महाखादी प्रदर्शनाचं १८ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईच्या विलेपार्ले इथं होणाऱ्या या प्रदर्शनात ग्रामीण कारागीर आणि उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना शहरी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गीतांजली बावीस्कर यांनी दिली आहे, ते आज मुंबई इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. या प्रदर्शनात खादी वस्त्र, खादी साड्या, शुद्ध सेंद्रिय मध, हळद, मसाले, कोल्हापूरी चप्पल, गूळ तसंच इतर ग्रामोद्योगी उत्पादनांच्या वस्तूंचे ५० स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत.

****

महाविद्यालयीन जीवनात आभासी विश्वातून येणाऱ्या प्रलोभनांपासून विद्यार्थ्यांनी सावध रहाव, असं आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या देवगिरी महाविद्यालयात 'सायबर गुन्हेगारीचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम' या विषयावरच्या व्याख्यानात त्या आज बोलत होत्या. आपण फसवले जातोय असं वाटताच सायबर पोलिसांची, महाविद्यालयाची आणि आपल्या पालकांची मदत घ्या, असं देखील चाकणकर म्हणाल्या.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं दिला जाणारा कवयित्री लीला धनपलवार विशेष काव्य पुरस्कार, नांदेडचे कवी पी. विठ्ठल यांना जाहीर झाला आहे. परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली. रोख ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

****

नांदेड जिल्ह्यात अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयामार्फत आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य आणि परिपूर्ण माहिती देण्यासाठी घरोघरी जावून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षणासाठी घरी येणाऱ्या अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना सर्व कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करावं, असं आवाहन अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयाकडून करण्यात आलं आहे.

****

बीड इथं मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजनेंतर्गत सर्व प्रशिक्षणार्थींच्या मागण्या मांडण्यासाठी आज जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं.

****